शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy
सत्यमेव जयते
उल्लास
ULLAS
नव भारत साक्षरता कार्यक्रम
एन सी ई आर टी
NCERT
ज्ञानसेना तु सम्मत्मम्
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र, पुणे

# उल्लास - नव भारत साक्षरता कार्यक्रम

# मराठी
# अक्षर कॅलेंडर




राज्य साक्षरता केंद्र,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**प्रेरणा -** **मा.डॉ. हेमंत वसेकर**

संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे

मा. श्री कृष्णकुमार पाटील

संचालक शिक्षण संचालनालय योजना

**मार्गदर्शन -** **मा. डॉ. कमलादेवी आवटे**

सहसंचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे

मा. डॉक्टर वंदना वाहुळ

उपसंचालक शिक्षण संचालनालय योजना

मा. डॉ. दीपक माळी उपसंचालक

राज्य साक्षरता केंद्र,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे

**संपादन -** **डॉ. गीतांजली बोरुडे**

उपविभाग प्रमुख राज्य साक्षरता केंद्र

श्री पंढरीनाथ जाधव

अधिव्याख्याता राज्य साक्षरता केंद्र

**संपादन सहाय्य - श्रीमती शितल उटगे**

विषय सहाय्यक राज्य साक्षरता केंद्र

श्रीमती विनया भोसले,

विषय सहाय्यक, राज्य साक्षरता केंद्र

**लेखन सहाय्य - विद्याधर शुक्ल,**

सेवानिवृत्त उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

महाराष्ट्र, पुणे

**मुखपृष्ठ, अक्षर जुळणी व चित्रे- श्री मनोहर बाविस्कर**

कलाशिक्षक - हिमालय हायस्कूल बोरिवली (प)

# स्वर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ऋ |
| ऌ | ए | अॅ | ऐ | ओ | ऑ | औ |

# स्वरादी

| | |
|---|---|
| ं (अनुस्वार) | ः (विसर्ग) |

# व्यंजने

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ |
| च | छ | ज | झ | ञ |
| ट | ठ | ड | ढ | ण |
| त | थ | द | ध | न |
| प | फ | ब | भ | म |

| | | | |
|---|---|---|---|
| य | र | ल | व |

| | | |
|---|---|---|
| श | ष | स |

| | |
|---|---|
| ह | ळ |

# विशेष संयुक्त व्यंजने / विशेष जोडाक्षरे

| | |
|---|---|
| क्ष | ज्ञ |

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of Education
Department of School Education and literacy

# अ




## अजगर

अमन आणि अमर यांना काल एक अजब अनुभव आला. एका लहान अजगराने वाट अडवली होती. अनेकजण अडकून पडले होते. समोरून आबा आले. आबांनी लगेच काठी आणि मोठी पिशवी आणली. अजगराला काठीने हळू हळू ढकलले. तो अलगदपणे पिशवीत शिरला. आबांनी पिशवीचे तोंड बंद केले. अमर,अमन नवलाने बघतच राहिले.



अडकित्ता




अननस

# आ




## आजी

आज आजीने आमच्यासाठी आंबट-गोड आमटी बनवली आणि सोबत आळूची भाजी , आमरस आणि आठ भाकरी  आईने आणून दिल्या. आम्ही आनंदाने आस्वाद घेतला आणि निरभ्र आकाशाखाली विश्रांती घेतली.



आई



आगगाडी

# इ



## इस्त्री

इंद्रधनुष्यासारखे रंग जीवनात भरू,
इतिहासात आपले नाव कोरु. इतके कष्ट
करूया आज , इच्छित यश नक्कीच मिळवू,
इतरांसाठी प्रेरणा बनू.




इंद्रधनुष्य



इमारत

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of Education
Department of School Education and literacy

# ई



## ईडलिंबू

जाई आणि जुई, नेहमी खेळायची घाई.
जाईने आणला ईडलिंबू, उंच उंच फेकला
ताईने मधेच अलगद झेलला.
जुई ओरडली ताईटले, कशाला आलीस कडमडायला?
जा तिकडे खेळायला.
आई पटकन आली. ताईला रागावली.
जाई जुई ईडलिंबू परत झेलू लागली.



जाई



समई

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# उ




## उशी

उषाताईंच्या घरात उंदराचा खूपच सुळसुळाट झाला होता. यासाठी शेजारच्या उमाबाई उगवे यांनी त्यांना मांजर पाळण्याचा उपाय सुचविला. उषाताईंनी उमाबाई यांचा सल्ला ऐकून मांजर पाळले आणि मांजरीच्या उपस्थितीमुळे घरातील उंदीर पळून गेले.



उंदीर



उखळ

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of Education
Department of School Education and literacy

# ऊ




## ऊस

ऊन छान पडले होते. भाऊंनी शेतातून ताजा ऊस आणला. सर्वांनीच मोठ्या आवडीने ऊस खाल्ला. काही जणांनी ऊसाचा गोड रस पिला. ऊसाच्या रसामुळे सर्वांना खूप ऊर्जा मिळाली.



पाऊस



देऊळ

# ऋ



## ऋषी

वसंत ऋतू होता. सकाळी ऋषी झाडाखाली बसून अभ्यास करत होते. ऋषींनी आपल्या शिष्यांना, निसर्गाचे सर्वांनी ऋण मानायला हवे असा आदेश दिला.



ऋद्राक्ष



ऋतू

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# ए



## एडका

एकदा जंगलात एक एडका फिरत होता. तो एकटाच एका झाडाखाली विसावा घेऊ लागला. तेवढ्यात त्याला त्याचा एक मित्र भेटला दोघांनी एकमेकांना मदत करून एकत्र राहण्याची शपथ घेतली.



एकतारी

१

एक

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

उल्लास ULLAS नव भारत साक्षरता कार्यक्रम

एन सी ई आर टी NCERT

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# ॲ



## ॲपल

सॅमने आपल्या बॅगेत नवीन बॅट आणि बॉल भरले. डोक्यावर निळी हॅट घालून तो टॅक्सीने मैदानावर पोहोचला. तिथे एक गोंडस कॅट (मांजर) कॅरमच्या बोर्डजवळ बसली होती. सॅमने आपल्या कॅमेऱ्यातून तिचे फोटो टिपले. खेळून झाल्यावर तो घरी आला. आजचा दिवस सॅमसाठी अगदी फॅनटॅस्टिक होता. त्याने कॅलेंडरवर आजच्या तारखेला खुण केली. शेवटी त्याने ॲपल खाल्ले आणि गॅसवर गरम केलेला चहा घेतला..



कॅट



रॅबिट






# ऐरण

ऐन संध्याकाळी आम्ही अंगणात जमलो. आजीची गोष्ट ऐकायला आम्ही शांतपणे बसलो. गोष्ट ऐकून आनंद झाला. असा आमचा दिवस आनंदात गेला. गोष्टीत ऐरण, ऐरावत सारखे शब्द होते. खास ऐतिहासिक ऐवजांविषयी ऐकून मनास आनंद झाला.



ऐक



ऐरावत

# ओ



## ओढा

ओझर गावच्या कडेला एक सुंदर ओढा वाहतो. ओढ्याचे पाणी खूप स्वच्छ आहे. आम्ही मित्र ओल्या वाळूचे  किल्ले बनवतो. आम्हा सर्वांना हा परिसर ओळखीचा वाटतो.



ओझेवाला



ओठ

**शिक्षा मंत्रालय**
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# ऑ



## ऑटोरिक्षा

**आज शाळेत सरांनी ऑक्सिजनचे महत्व सांगितले. नंतर मैदानावर आम्ही मुले ऑलिम्पिक विषयी गप्पा मारत होतो. खेळताना पडल्यामुळे समीरच्या पायावर छोटे ऑपरेशन करावे लागले पण तो डगमगला नाही. ऑगस्ट महिन्यामध्ये होणाऱ्या स्पर्धांसाठी तो पुन्हा तयार झाला.**



**डॉक्टर**




**ऑगस्ट**

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy
उल्लास ULLAS नव भारत साक्षरता कार्यक्रम
एन सी ई आर टी NCERT
ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# औ



## औषध

मनामध्ये नेहमी औदार्य असणारे आमचे बाबा शेतात औतानी जमीन कसत होते. त्यांना बरे न वाटल्याने ते बांधावरील औदुंबराच्या झाडाखाली बसल्यानंतर आईने त्यांना डॉक्टरांकडून आणलेले औषध दिले. औषध घेतल्यावर त्यांना बरे वाटू लागले.



औदुंबर



औत

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy
उल्लास ULLAS नव भारत साक्षरता कार्यक्रम
एन सी ई आर टी NCERT
ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# अं



## अंगठी

आमच्या अंगणात एक अंजीराचे झाड आहे. संध्याकाळी आम्ही सर्व मित्र अंगणात अंक मोजण्याचा खेळ खेळत असतानाच आईने सर्वांना खाण्यासाठी अंजीर दिले. अंजिराच्या गोडीने आमचे अंग अंग शहारले.



अंगठा



अंबर

# अः



## प्रातःकाल

एकदा एका मुलाने पाहिले की एक मुलगा खूप दुःखी होता. त्याने विचार केला की दुसऱ्याचे दुःख दूर करणे हेच खरे पुण्य आहे. त्याने स्वतःजवळचा खाऊ त्या मुलाला दिला. ते पाहून तो मुलगा निःशब्द झाला. स्वतःच्या आनंदापेक्षा निःस्वार्थ भावनेने दुसऱ्याला मदत करण्यात जास्त सुख असते, हे त्याला उमजले.

**नमः**

**अंततः**

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# क



## कप

काकीने काकाच्या काळ्या
कपाटातले कामाचे कागद
कात्रीने  करा करा कापले.



कबूतर



करवंद

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of Education
Department of School Education and literacy

# ख



## खडू

सखूने जमिनीवर खडूने खिडकीचे चित्र काढले. चित्रातील खिडकी अगदी खरी खुरी वाटत होती. ते पाहून आईने त्याला कौतुकाने  खारीक व खोबरे खाण्यास दिले



खजूर




खटारा

# ग



## गवत

गणेश आणि गीता गावातील बागेत गेले तिथे हिरवेगार गवत, गुलाब व गुलमोहर यांचे फुले पाहून गमतीने गाणे गाऊ लागली.



गरुड



गुलाब


शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of Education
Department of School Education and literacy

# घ




## घर

आईने घरातील घड्याळात पाच वाजलेले पाहताच स्वयंपाक सुरू केला. जेवणाचा घमघमाट सुटला होता. घनश्याम शेजारच्या बागेत घसरगुंडीवर खेळत होता. सायंकाळी मंदिरातील घंटेचा घुमणारा आवाज ऐकून घाईघाईने घनश्याम घरात आला. आईने तयार केलेल्या पदार्थांचा घाईघाईने घास घेऊ लागला.



घरटे




घड्याळ


शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# च



## चमचा

चिनू चमच्याने चिवडा खात होती. अचानक तिला एक  चिमणी दिसली. तिने चिमणीला चिवडा खाण्यास दिला .चिमणीने त्यातील  एक दाना  तोंडात घेतला व चिऊ चिऊ करत उडून गेली .



चरखा



चिमणी

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of Education
Department of School Education and literacy

# छ



## छत्री

छगनकडे एक छान छोटी छत्री आहे. त्याची छोटी बहीण छाया आहे. तिला छोट्या गारा वेचायला छान वाटते. छाया छगनची छोटी छत्री घेऊन गारा पडण्याची वाट पाहू लागली.



छडी



छप्पर

# ज



## जहाज

जरा जोर लावा - जमेल जमेल
ज्यादा मेहनत करा - जमेल जमेल
जीभेला आवरा - जमेल जमेल
जीव ओतून राबा - जमेल जमेल
जुने नवे जुळवा - जमेल जमेल
जे मिळेल ते शिका - जमेल जमेल
जोमाने सुरुवात करा - जमेल जमेल
जैवविविधता टिकवा - जमेल जमेल
जरा गाली हसा - जमेल जमेल



जग




जांभूळ

# झ



## झबलं

झबलं म्हणालं, मोठं मला व्हायचंय |
झूल नको बाई फुलांनी सजायचंय ॥१ ॥
झाड म्हणालं, बळकट व्हायचंय झुल्यावर
मुलींना झुलताना पहायचंय ॥२॥



झाड



झरा

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# ट



## टरबूज

टिंब टाचणीवर टुणकन बसलं
टिवल्याबावल्या करत सुटलं ॥
टुणटुण उड्या होतं मारीत,
टुमदारपणे गप्पा करीत ॥



टिटवी



टाचणी

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy

# ठ



## ठसा

ठरवून आली ठमी घरी,
ठक ठक  ठक ठक  थाप दारी.
ठमीचा झगा लांब आणि छान,
ठमी करते नर्तन भारी.

८

आठ




ठोकळा

# ड



## डबा

डहाळीवरचा डोकेबाज डोमकावळा,
डुलत डुलत डब्यावर येऊन बसला,
डोकावून पहिले डब्यात दिसला लाडू,
चोचीतल्या चोचीत खुदकन हसला.



डफली



डमरू

# ढ



## ढग

ढमाकाकूंनी ढगाकडे बघून आपल्या ढोरांना गोठ्यामध्ये ढकलले.



ढाल



ढोल

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy

# ण



## पणती

श्रावण महिना आला, की सणांची रेलचेल सुरू होते. गणपती बाप्पाच्या आगमनाने सगळीकडे चैतन्य पसरते. आईने सणानिमित्त जेवणात वरण आणि पुरणपोळी केली होती.



खण



बाण

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# त



## **तराजू**

**तारा ग तारा किती तुझा तोरा.**
**एक काम सांगितलं तर तक्रारी सतरा.**
**असं तसं सांगू नको. तासभर लावू नको.**
**ऊठ तरी आता. आवर भरा भरा.**
**जा तरा तरा. थोडीतरी तिकडून भाजी**
**आण जरा.**



**तवा**



**तलवार**

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy

# थ



## थवा

दशरथ नावाचा एक मुलगा होता. तो खेळताना आपला लाकडी रथ ओढत असे. खेळून झाल्यावर त्याच्या माथ्यावर घामाचे थेंब आले. आईने त्याला मातीच्या रांजणातील थंड पाणी प्यायला दिले. जेवायला बसताना आईने पितळी थाळीत गरम पिठले आणि थालीपीठ वाढले. दशरथला हे जेवण खाऊन खूप आनंद वाटला.



थाळी



नथ

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

उल्लास ULLAS
नव भारत साक्षरता कार्यक्रम

एन सी ई आर टी NCERT

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# द



## दप्तर

दत्ताचे दात खूप दुखत होते. म्हणून त्याचे दादा त्याला दवाखान्यात घेऊन गेले. दवाखान्याचा दरवाजा उघडून ते आत दाखल झाले. तेथे डॉक्टरांनी दत्ताला तपासले व औषध दिले. दत्ताला खूप दिलासा मिळाला. दवाखान्यातील डॉक्टरांनी दिलेल्या औषधाने दत्ताचे दुखणे दूर झाले.



दात



दरवाजा


शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# ध




## धरण

धनंजयने आपल्या खात्याताल धन सुरक्षित ठेवण्यासाठी डिजिटल बँकिंगचा धडा गिरवला. त्याने धाडस करून बँकेत जाऊन जन-धन खाते काढले.धनादेश कसा भरायचा? हे शिकून घेतले.  मोबाईलवर व्यवहार करताना पिन कोणालाही सांगू नका, हा मोलाचा धडा त्याने सर्वांना दिला. धनंजयने डिजिटल फसवणुकीचा धोका ओळखून सर्वांना धैर्याने व्यवहार करायला शिकवले. त्याच्या या धडपडीमुळे गावातील लोकांचा बँकेवरचा विश्वास वाढला. आता सर्वजण धिटाईने आपल्या धनाची देवाणघेवाण संगणकावरून करू लागले आहेत.



धबधबा



धनुष्य

# न



## नळ

नमन सकाळी लवकर उठला. त्याने नळाला पाणी येते का ते पाहिले. नळाला पाणी येत नाही हे पाहून नमनची आई नदीवर पाणी आणण्यास गेली. नमनच्या आईने नाकात नथ घातली होती. नदीवरून परततांना नथ पडली. नमनने जाऊन नथ शोधून आणली.



नळ



नोट


शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy
उल्लास ULLAS नव भारत साक्षरता कार्यक्रम
एन सी ई आर टी NCERT
ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# प



## पपई

परवा पारगावात एक सभा झाली. पिंपळगाव व परळी या गावांच्या परिसरातले गावकरीही जमले होते. पाणी जमिनीत कसे मुरवावे? पाणी जपून वापरावे यावर चर्चा झाली. शेतीचे जाणकार श्री. पिराजी पाटील यांनी ही माहिती दिली. पावसाचे पाणी चर, खड्डे करून कसे साठवावे हे सांगितले. सायंकाळी पाच वाजता सभा संपली.




पतंग



पाऊस

# फ



## फणस

फकीरा हा शेतकरी होता. तो नेहमी डोक्याला फेटा बांधायचा. त्याच्या शेतात फळ झाडे होती. झाडांना फळे व फुले लागलेली बघून फकिरास आनंद झाला. त्याने आपल्या शेतातील एक फणस आपल्या फौजी मित्रास दिले व त्याच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.




फणी



फळे

# ब



## बटाटा

बबन सकाळी बस स्थानकात पोहचला. बसमध्ये बसण्यापूर्वी बसचा नंबर त्याने वाचला तसेच बस कोठे जाणार आहे याची माहिती वाचली. नंतर तो बसमध्ये बसला. त्याने बसचे तिकीट काढले आणि तालुक्याच्या बँकेत पोहोचला. बँकेच्या बाकावर बसून त्याने आपल्या कष्टाची बचत खात्यात जमा केली. बसने परत येताना बबनच्या मनात एकच विचार होता, "केलेली बचतच संकटात बळ देते."




बदक



बस

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# भ



## भटजी

भारत आपला देश आहे. आपण सारे भारतीय आहोत. आपल्याला कायद्याचे भान आहे. कोणतीही भीती न बाळगता भ्रष्टाचार करणार नाही व करू ही देणार नाही असे व्रत आपण घेऊया. एकमेकांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहूया. भारत माता की जय.



भोवरा



भिंगरी


शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of **Education**
Department of School Education and literacy

# म




## मका

महादू  नावाचा एक प्रामाणिक मजूर होता. मतदानाचा दिवस जवळ आला होता. महादूने ठरवले की, कामाचा मोह सोडून आपण मतदान करायला जायचे. त्याने आपल्या मनातील योग्य उमेदवाराला मत दिले. महादूला माहित आहे की, प्रत्येक मत मोलाचे आहे. मतदान करणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे. आपल्या  एका मतामुळे चांगला माणूस निवडून येऊ शकतो. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने मनापासून  मतदान केलेच पाहिजे.



मगर




माठ

# य




यज्ञ

यामिनीताई या या,योगेशदादा या या.
योगासने शिकूया. येता जाता गाऊया.
यारा-दोस्तांना बोलवूया. यशला जरा चिडवूया.
यम्मी आईसक्रीम खाऊया, याSSहू करत ओरडूया.
युरोप टूर काढूया. या या तुम्ही लवकर या.



यान



गाय

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy
उल्लास ULLAS
एन सी ई आर टी NCERT
ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# र



## रस

राजू आणि राणी रत्नागिरीला राहत होते. रविवारची रमणीय सकाळ होती. राजूने रंगीबेरंगी रथाचे चित्र काढले. राणीने रांगोळी काढली. त्यामध्ये रंग भरले. राजू व राखीने रसाळ फळे व रबडी आणली व आनंदाने खाल्ली.



रंग



रथ

# ल



## लसूण

ललिता लातूरला लाडात  लहानाची मोठी झाली. तिला लख्ख प्रकाश व लाल रंग खूप आवडायचा. लक्ष्मी काकूंनी तिला लाडू खायला दिला. लाडू खाऊन तिला खूप आनंद झाला.



लवंग




लिंबू

# व



## वड

वरुण आणि वंदना वसंत ऋतूत विलोभनीय वनराई मध्ये वनवन भटकत होते. वडिलांनी त्यांना वडाच्या झाडाखाली बसण्यास सांगितले. वारा वाहत होता. तिथे बसून दोघांनी वरणभात खाल्ला.



वटाणा



वस्त्र


शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# श



## शहाळ

शारदा शाळेत शिस्तीत जाते.
शुभ्र शर्ट घालून ती वर्गात बसते.
शूरवीरांच्या गोष्टी ऐकून येते स्फूर्ती
शीतल शांत वारा गातो त्यांची कीर्ती.




शेतकरी



शहामृग

# ष




## षटकोन

षटकोनी आकाराच्या मैदानावर क्रिकेटच्या सामन्यात षडाननने सहा षटकार मारले. तो षष्टीचा दिवस होता. षडयंत्राचा वापर करून संतोष व पियुषने  त्याला बाद केले हे  विशेष.




चषक



अष्टकोन

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of **Education**
Department of School Education and literacy

उल्लास ULLAS नव भारत साक्षरता कार्यक्रम

एन सी ई आर टी NCERT

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र पुणे

# स



## समई

सारिका नुकतीच सोनगावहून साकुरी गावी परतली. साकुरी हे तीचे सासर होते. सासू, सासरे, सारिका आणि पती वसंता असे कुटुंब होते. एकमेकांना सांभाळून दिवस सुखाने सरत होते. पण सोमवारपासून सासूबाईंचे काहीतरी बिनसले. पण वसंताने सगळ्यांची समजूत घातली. घर परत हसते खेळते झाले.



सफरचंद



संत्री

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# ह



## हत्ती

हर्ष नावाचा हुशार मुलगा हडपसर येथे राहत होता. हव्याहव्याशा वातावरणात एक हत्ती तिथे आला. हर्षने हसत हसत त्याला हिरवा चारा व हरभऱ्याची डाळ दिली. हत्तीने आपली सोंड हलविली. हर्षच्या हृदयात हळूहळू आनंदाची लाट उसळली.



हरीण



हळद

**शिक्षा मंत्रालय**
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

# ळ



## कमळ

निळ्या भोर आकाशाखाली, जवळच असलेल्या शाळेत मुले आनंदाने खेळत होते. बागेतील कोवळ्या उन्हात पिवळी फुले डोलत होती. वेळ मजेत जात असतानाच, जवळपासच्या झाडावरचा एक खारीचा खेळ सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. सकाळी लवकर उठून, अंघोळ उरकून ही सर्व मुले अभ्यासाच्या ओढीने एकत्र आली होती. गुरुजींनी मुलांना फळा पुसायला सांगितला आणि नव्या धड्याची ओळ वाचून दाखवली. अभ्यासाच्या वेळी अभ्यास आणि खेळाच्या वेळी खेळ, ही शिस्त ही सगळी मुले पाळत होती.



बाळ



माळ

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
**Education**
Department of School Education and literacy

उल्लास ULLAS
नव भारत साक्षरता कार्यक्रम

एन सी ई आर टी
NCERT

# क्ष



## शिक्षक

क्षितिजकडे खूप साऱ्या क्षमता आहेत. तो क्षणा क्षणाला  नवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करायचा. तो कुणाचीही क्षती होणार नाही असे वागायचा. त्याची वृत्ती क्षमाशील होती. निसर्गच त्याचा शिक्षक होता .



क्षत्रिय



रिक्षा

शिक्षा मंत्रालय
स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग
Ministry of
Education
Department of School Education and literacy

# ज्ञ



**यज्ञ**

ज्ञानेश नावाचा एक मुलगा होता. तो शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करायचा. त्याला ज्ञात-अज्ञात गोष्टींचा शोध घेणे आवडायचे. त्याच्याकडे ज्ञानाचा मोठा साठा होता. ज्ञानेंद्रियांबद्दल त्याने विशेष माहिती मिळविली होती.



**प्रतिज्ञा**



**ज्ञानेश्वर**

# उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम

